**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
**E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक:- २५/०१/२०१८

**नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे २६ जानेवारीला विघ्नहर्ता बक्षीस वितरण व मुद्देमाल वाटप मोहिम**

---

नाशिक ग्रामीण जिल्हयात गतवर्षात गणेशउत्सवा दरम्यान विघ्नहर्ता बक्षीस योजना राबविण्यात आली होती, सदर योजनेअंतर्गत उत्कृष्ट मंडळांची निवड करून त्यांना बक्षीस वितरणाचा कार्यक्रम तसेच जिल्हयात घडलेल्या दरोडा, जबरीचोरी, घरफोडी व चोरीचे उघडकीस आलेले गुन्हयांमधील निष्पन्न आरोपीतांकडुन जप्त केलेला मुद्देमाल संबंधीत तक्रारदारांना वाटप करण्याची मोहिम नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे आयोजित केली आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे संकल्पनेतुन सदर मोहिम दिनांक २६ जानेवारी २०१८ रोजी सकाळी ११:०० वा. **नाशिक इंजिनियरिंग क्लस्टर हॉल, एक्स्लो पॉईंट, गरवारे-अंबड लिंकरोड, नाशिक** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यक्रम प्रसंगी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य मा.ना.श्री. गिरीषजी महाजन सो**. यांचे प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच नाशिक परिक्षेत्राचे **विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. विनयकुमार चौबे सो., मा.जिल्हाधिकारी श्री. बी. राधाकृष्णन सो** यांचे उपस्थितीत जिल्हयातील विविध क्षेत्रातील मान्यवर कार्यक्रमास उपस्थित राहणार आहे.

मा.पोलीस अधीक्षक सो यांचे संकल्पनेतुन नाशिक ग्रामीण जिल्हयातील गणेश मंडळांसाठी सन २०१७ मध्ये **''विघ्नहर्ता बक्षीस योजना''** राबविण्यात आली होती. सदर योजनेअंतर्गत जिल्हयातील विविध गावांमधील एक गाव एक गणपती व तालुका स्तरीय सार्वजनिक गणेश मंडळांनी सादर केलेली गणेश आरास, उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक एकता, राष्ट्रीय एकात्मतेवर आधारीत देखावे, बेटी बचाव, ग्राम स्वच्छता अभियान यावर आधारित देखावे / कार्यक्रम सादर करणा-या गणेश उत्सव मंडळांना वरील कार्यक्रमप्रसंगी **बक्षिसे प्रदान** करण्यात येणार आहे. सदर योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय व पोलीस ठाणे उपविभागनिहाय विजेते गणेश मंडळांना **मा.पालकमंत्री श्री.गिरीषजी महाजन यांचे हस्ते बक्षिस वितरण** करण्यात येणार आहे. तरी नागरीकांनी जास्तीत प्रतिसाद देवुन सदर कार्यक्रमप्रसंगी उपस्थित रहावे असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.

तसेच नाशिक ग्रामीण जिल्हयातील ४० पोलीस ठाणे निहाय दाखल असलेले मालाविरूध्दचे गुन्हयांमधील उघडकीस आलेले गुन्हयांमध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल फिर्यादीस प्रदान करणेबाबत मोहिमेचेही आयोजन करण्यात आले आहे. सदर मोहिमेत मालाविरूध्दचे गुन्हयांमध्ये चोरीस गेलेले सोने-चांदीचे दागिने, मोटर सायकली, चारचाकी वाहने, मोबाईल फोन, रोख रक्कम, तसेच इतर मुद्देमाल संबंधीत तक्रारदारांना वाटप करण्यात येणार आहे. सदर मोहिम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी जिल्हास्तरीय पोलीस समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हयातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये उघडकीस आलेले गुन्हयांमधील तक्रारदारांना त्यांचा मुद्देमाल परत मिळावा यासाठी तक्रारदरांनी सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.